# राष्ट्रभक्ती व व्यसनमुक्तीचे अनेक कला प्रकार सादर करुन ज्ञानोपासक महाविद्यालयाचे स्नेहसंमेलन संपन्न

**परभणी :**

'ज्ञानोत्सव २०१४' वार्षिक स्नेहसंमेलनाचा बक्षिस वितरण आणि समारोप समारंभ संपन्न झाला. हास्यसम्राट प्रा. दीपक देशपांडे यांच्या 'हास्यकल्लोळ' कार्यक्रमाने धमाल हशा पिकवला. प्रमुख अतिथी प्रा. देश्पांडे यांच्या हस्ते विविध सन्मान व बक्षिस वितरण करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर अध्यक्षा प्रभारी प्राचार्या डॉ. सौ. संध्याताई दुधगावकर, प्रा.डॉ. अशोक जोंधळे, प्रा.डॉ. खनाळे, उपप्राचार्य अरुण भांगे आणि विद्यार्थी संसदेचे गुणवंत विद्याथी उपस्थित होते.

ज्ञानोपासक महाविद्यालयामध्ये दरवर्षीप्रमाणे वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन २६ जानेवारी ते ३१ जानेवारी २०१४ या दरम्यान करण्यात आले होते. विविध वाङमयीन, बौध्दिक, क्रीडा, कला स्पर्धांच्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी बहुसंख्येने सहभाग नोंदवला. हास्यसम्राट प्रा. दीपक देशपांडे यांनी तब्बल दीड तास हास्याचे कारंजे उडवत उपस्थितांची मने जिंकली. त्यांच्या आवाजाच्या जादूई सादरीकरणाने दाद मिळवली. प्रत्यक्ष विद्यार्थ्यांसमोर सादरीकरण करताना प्रा. देशपांडे यांनी हास्यविनोद करताना कुटूंब, समाज, कला, क्रीडा, राजकरण व राजकारणी सर्वांचेच हुबेहूब समाचार घेतले. त्यांच्या वैशिष्ट्येपूर्ण शैलीने प्रेक्षक खिळवून ठेवले. दरम्यान विजेत्या स्पर्धकांना बक्षिस वितरीत करण्यात आले. प्रस्तावना प्रा.डॉ. अशोक जोंधळे, अहवाल वाचन प्रा. डॉ. प्रकाश खनाळे, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. भीमराव खाडे यांनी केले. स्पर्धेतील क्रीडा विभाग बक्षिस प्रा.डॉ. माधव शेजूळ यांच्या संचलनाने देण्यात आले. तर सांस्कृतिक विभागाचे बक्षिस वितरण संचालन आणि आभार प्रदर्शन प्रा. अरुण भांगे यांनी करुन कार्यक्रमाची सांगता केली.

# ज्ञानोपासक महाविद्यालय परभणी येथे 'गौरव स्त्री शक्तीचा' कार्यक्रम

**परभणी :**

भारतीय समाजातील स्त्रीयांचे महत्त्व, त्यांच्याबद्दलचा आदर व्यक्त करण्यासाठी जुन्या रुढी परंपरेचे जतन करीत आधुनिकतेच्या वाटेवर राहून कुटुंबाचा व समाजाचा आधार बनलेल्या कांही स्त्रीयांचा सन्मान कण्याचे ज्ञानोपासक शिक्षण संस्थेने ठरविले आहे. अशा उतकृष्टतेच्या शिखरावर असलेल्या स्त्री शक्तीचा गौरव दि. १८ जानेवारी २०१४ रोजी दु. ३.०० वाज. सांस्कृतिक सभागृह ज्ञ ाानोपासक महाविद्यालय, परभणी येथे होणार आहे. या सत्काराला ज्ञानोपासक शिक्षण संस्थेच्या सचिव डॉ. सौ. संध्याताई दुधगावंकर यांची उपस्थिती राहाणार आहे.

अशा समजाभिमुख व समाजाला पुढे नेणाऱ्या व प्रतिकुल परिस्थितीवर मात करुन आपले व कुटुंबाचे स्तर उंचावणाऱ्या महिला प्रतिनिधींचा सत्कार आयोजित केला आहे. तरी सर्व विद्यार्थिनी, महिला व नागरीक, परभणी शहरातील इतर महाविद्यालयातील प्राध्यापक यांनी उपस्थित राहावे असे आवाहन ज्ञानोपासक महाविद्यालय परभणी तर्फे करण्यात आले आहे.

# स्त्रियांच्या प्रश्नांकडे बघण्याची अभिनव दृष्टी सावित्रीबाईंनी दिली

**- प्रा. प्रतिमा परदेशी**

**परभणी :**

येथील ज्ञानोपासक महाविद्यालयात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या सत्यशोधक जागर मासिकाच्या संपादिका तथा विद्रोही सांस्कृतीक चळवळच्या अध्यक्षा प्रा. प्रतिमा परदेशी प्रमुख व्याख्यात्या म्हणून बोलत होत्या. त्या बोलतांना पुढे म्हणाल्या की, यशवंत सारख्या मुलाला डॉक्टर बनवून सावित्रीबाईंनी मातृत्वाचा नवा अर्थ या समाजव्यवस्थेला दिला. वित्त भांडवलशाहीच्या या कालखंडात महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे विचार समाताष्ठित, जातविरहीत समाज निर्मितीचे मुल्य जोपासण्यास प्रवृत्त करतात. फुले दांपत्यांना आपल्या शाळेत गतिणासारखे व्यवहरोपयोगी विषय अभ्यासक्रमात आणून शेतकरी आणि कुणबी अर्थव्यवस्थेतील मुलांना आकडेवारी आणि हिशोबांचे शिक्षण दिले. ज्याचा हेतू सावकारी पाश्यातून शेतकरी कुटूंबांना मुक्त करणे असा होता. केवळ बौध्दीक संपदा निर्माण करुन भागणार नाही तर बौध्दीक संपदा आणि श्रम यांची सांगड घालून नवा आदर्श फुले दांपत्यांनी निर्माण केला. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी प्राचार्य डॉ. प्रकाश मोरे हे होते. अध्यक्षीय समारोप करतांना ते म्हणाले की, शिक्षण आपल्यातील पशुत्व हटविते. हे सावित्रीबाईनी सांगितले हे प्रखर वास्तव आहे.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रा.से.यो. चे कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. इबतवार यांनी केले. प्रा. प्रतिमा परदेशी यांचा परिचय प्रा.डॉ. हरकळ यांनी करुन दिला. या कार्यक्रमास प्रा.डॉ. वामनराव जाधव, प्रा. कवि इंद्रजित भालेराव, प्रा.डॉ. सुर्यवंशी, प्रा.डॉ. सुनिल शिंदे, डॉ. तवार, डॉ. सोंडगे, डॉ. जोंधळे, डॉ. कांबळे, डॉ. गंगणे, प्रा. लोढे आदी प्राध्यापक आणि विद्यार्थी व विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रा. लोंढे यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रम संपला.

# भारतरत्न नेलसन मंडेला आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

**परभणी :**

येथील ज्ञानोपासक महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनाच्या वतीने दि. ६ डिसेंबर रोजी दक्षिण आफ्रिकेतील वंशवाद नष्ट करण्यासाठी संघर्ष करणारे आणि वंचिताच्या हक्कासाठी सतत प्रयत्नशील असणारे भारतरत्न नेल्सन मंडेला आणि या देशातील जातीयता नष्ट करण्यासाठी, राष्ट्रीय एकात्मता प्रस्थापित करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करणारे आणि वंचितामध्ये स्वाभीमान निर्माण करणारे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली वाहण्यात आली.

या प्रसंगी प्राचार्य प्रकाश मोरे, उपप्राचार्य प्रकाश खनाळे यांनी आदरांजलीपर मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्तविक आणि सुत्रसंचालन प्रा. डॉ. भीमराव खाडे यांनी तर आभार कार्यक्रमाधिकारी डॉ. दशरथ इब्बतवार यांनी मानले.

डॉ. वामनराव जाधव, डॉ. हल्लाळे, डॉ. गरड, डॉ. सूर्यवंशी, डॉ. हमिदुल्ला खान, डॉ. तवार, प्रा. इंद्रजित भालेराव, डॉ. सांगळे, डॉ. सोंडगे, डॉ. हरकळ, डॉ. ए.ई. जाधव, डॉ. मुळे, डॉ. बाबर, डॉ. शिंदे, डॉ. ए.डी. शिंदे, डॉ. यु.एल. इंगळे, श्री. रावसाहेब शिंदे, शैलेंद्र कांबळे, श्री. सुकणे डि.एस., श्री. मस्के, डॉ. पंडीत प्रभाकर प्रा. हडगेकर मॅडम आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# कविवर्य फ.मुं. शिंदे गौरव सोहळयाचे आयोजन

**परभणी :**

जानेवारीत सासवड येथे होणाऱ्या अखिल भारतिय मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष फ.मुं. शिंदे यांच्या विशेष भव्य गौरव सोहळयाचे आयोजन परभणीच्या ज्ञानोपासक शिक्षण मंडळाच्या वतीने करण्यात आलेले आहे. यावेळी परभणी जिल्ह्याचे पालकमंत्री मा.श्री. सुरेश धस यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. त्यांच्या हस्ते संमेलनाध्यक्षांचा भव्य सत्कार करण्यात येणार आहे. या गौरव सोहळयाच्या अध्यक्षपदी माजी मंत्री आणि विद्यमान खासदार ॲड. गणेशरावजी दुधगावकर राहणार आहेत. ज्ञानोपासक शिक्षण मंडळाच्या सचिव आणि परभणीच्या ज्ञानोपासक महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. सौ. संध्याताई दुधगावकर यांची विशेष उपस्थिती व्यासपीठावर असणार आहे.

हा कार्यक्रम गुरुवारी २८ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.०० वाजता परभणीच्या ज्ञानोपासक महाविद्यालयात होणार आहे. कार्यक्रम सर्वांसाठी खुला असणार आहे. साहित्य रसिकांनी व परभणीकर नागरिकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश मोरे यांनी केलेले आहे.

# कठोर परिश्रमातूनच उच्च उद्दिष्ट प्राप्त करण शक्य : प्राचार्य प्रकाश मोरे

**परभणी :**

येथील ज्ञानोपासक महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागाने आयोजित केलेल्या गुणगौरव सोहळ्याला संबोधताना, कठोर परिश्रम केल्यानंतरच केंद्रीय, आणि राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षा उत्तीर्ण होणं शक्य आहे, चिकाटी, जिद्द आणि कठीण परिश्रमच व्यक्तीला यशस्वी करतात.

प्राचार्य प्रकाश मोरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या गुणगौरव सोहळ्यात विविध क्षेत्रातील निवड झालेल्या प्राध्यापकांचा, रसायनशास्त्रात CSIR-NET परीक्षा उत्तीर्ण झालेल्यांचा तसेच डिपार्टमेंट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी विभागातर्फे रसायनशास्त्र या विषयात उच्च शिक्षण आणि पीएच.डी. करण्यासाठी इन्स्पायर फेलोशीप मिळालेल्या गुणवंत्ताचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी उपप्राचार्य अरुण भांगे, प्रा.के.बी. सालमोटे, प्रा.डॉ.अणदूरकर, शैलेंद्र कांबळे, कु.श्रध्दा शिंदे, निलेश शिंदे, कु.रोहिणी उदावंत, प्रा.चक्रवार, डॉ.गोस्वामी, डॉ.केंद्रे, डॉ.थोरात, प्रा.उत्तम इंगळे, प्रशांत कुलकर्णी इत्यादींचा रसायनशास्त्र विभागाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहूणे प्रा.डॉ.अशोक जोंधळे, प्रा.इंद्रजित भालेराव हे होते. या प्रसंगी प्रा.डॉ.अणदूरकर, उपप्राचार्य प्रा.अरुण भांगे, शैलेंद्र कांबळे यांनी मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ.वामनराव जाधव यांनी केले, सूत्रसंचालन प्रा.डॉ.भिमराव खाडे यांनी तर आभार प्रा.एन.आर. शिंदे यांनी मानले. मा.अॅड.गणेशरावजी दुधगावकर यांनी सर्व गुणवंताचे अभिनंदन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.डॉ.सुधाकर भुसारे, प्रा.डॉ.एस.बी. ताठे, प्रा.श्रीकांत पेंडलवार, प्रा.जाधवर, प्रा.कासराळीकर, प्रा.निलवर्ण, प्रा.अगरमोरे आदींनी प्रयत्न केले.